पुढारी - 18/6/2015

# २५० खाटांसह वैद्यकीय पथक असेल तत्पर

## रुग्णसेवेत डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय रुग्णालयाचा असेल सहभाग

नाशिक : प्रतिनिधी

२००३च्या कुंभमेळ्यामधील दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात प्रशासनाकडून सर्वतोपरी काळजी घेतली जात असतानाच, मोठ्या संख्येने भाविक येणार आहेत. त्यामुळे साथीसारखे आजार पसरण्याचीही शक्यता लक्षात घेऊन मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय रुग्णालयाने सुमारे २५० खाटा राखीव ठेवल्या आहेत. एवढेच नव्हे, तर पर्वणी काळात भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी ठिकठिकाणी वैद्यकीय पथक तयार करण्यात आले आहेत.



आरोग्य सेवा

सिंहस्थ कुंभमेळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. तो ऐन पावसाळ्यात येत असून, या धार्मिक उत्सवासाठी लाखो भाविक येण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने आरोग्य उपसंचालक विभागाच्या मदतीने वैद्यकीय पथकांची निर्मिती केली आहे. यासाठी आरोग्य विभागाने शहरातील वैद्यकीय रुग्णालये व महाविद्यालयांचीही मदत घेतली आहे. यामध्ये मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय रुग्णालयाचाही विशेष सहभाग असेल, अशी माहिती रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी दिली.

सिंहस्थ पर्वणी काळात लाखो भाविक शहरात दाखल होणार आहेत. यात देश-विदेशातून भाविकही येण्याची शक्यता आहे. पावसाळ्याचा काळ असल्याने साथीचे आजार पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुर्दैवाने या काळात दुर्घटना घडल्यास या आपत्तीला तोंड देण्यासाठी डॉ. पवार वैद्यकीय रुग्णालयात अत्यावश्यक बाब म्हणून २५० खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे ऐनवेळी रुग्णांना त्याठिकाणी दाखल करता येऊ शकेल.

त्याचप्रमाणे, सिंहस्थ काळात शहरात ठिकठिकाणी वैद्यकीय पथकही याच रुग्णालयामार्फत पाठविले जाणार आहेत. तसेच, फिरता दवाखानाही असेल. त्यामध्ये तज्ज्ञ वैद्यकीय पथक रुग्णसेवेसाठी तत्पर असणार आहे. ही सेवा २४ तास तत्पर असेल. वैद्यकीय पथकाकडून प्रत्येक ठिकाणी रुग्णांची तत्काळ तपासणी केली जाईल. दुर्दैवाने अवचित घटना घडल्यास याच रुग्णालयात तातडीने शस्त्रक्रियेसाठीही पथक सज्ज असणार आहे. सिंहस्थ काळातील कोणत्याही स्थितीमध्ये तत्पर सेवा देण्यासाठी मविप्रचे डॉ. पवार वैद्यकीय रुग्णालय सज्ज असेल, अशी माहिती डॉ. मृणाल पाटील यांनी दिली.

गांवकरी - 2/8/2015

# आरोग्य विभाग कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

। नाशिक ।

पवित्रच्या डॉ वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्यावतीने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या ५ जिल्ह्यातील वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले असून, जिल्ह्याच्या आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी हे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या सरचिटणीस नीलिमा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. प्रशिक्षणाचे समन्वयक डॉ प्रदीप बढे यांनी प्रास्ताविक करून स्वागत केले. महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ मृणाल पाटील यांनी रुग्णालयाची माहिती देऊन रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विविध रुग्ण सुविधा, सवलती व निष्णात डॉक्टरांची रुग्ण सेवा शहर व जिल्ह्यातील सर्वसामान्यांसह गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहोचवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.




। नाशिक। सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी मराठा विद्या प्रसारक समाजाच्या सरचिटणीस नीलिमा पवार, डॉ. प्रदीप बढे, डॉ गौरी दिवाण.

सरचिटणीस नीलिमा पवार यांनी संजीवनी २ बीएलएस हे प्रशिक्षण कुंभमेळ्या व्यतिरिक्त दैनंदिन कामकाज करताना निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी ठरणार असल्याचे सांगितले. डॉ सुनील औंधकर यांनी स्त्रीरोग विभागाच्यावतीने पवित्र रुग्णालयात रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधांची माहिती दिली. प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ प्रदीप बढे, डॉ गौरी दिवाण यांनी आपत्कालीन परिस्थितीत प्रत्यक्ष काम कसावे याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली तर डॉ. बालाजी आलमले यांनी कुंभमेळ्यात आरोग्याविषयी समस्यांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी माहिती दिली. यावेळी राज्याचे डॉ. श्रीराम गोसावी, आरोग्य सेवा विभागाच्या प्रशिक्षण केंद्राच्या गायकवाड, गधाडे उपस्थित होत्या. या प्रशिक्षणात आरोग्य सेवा विभागातर्फे सेवाच्या एएनएम, एलएचवी व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी सहभागी झाले.

देशदूत - 2/8/2015

# डॉ. पवार महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**नाशिक ।** मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्यसेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणात नाशिकसह धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या ५ जिल्ह्यांतील वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले होते. जिल्ह्याच्या आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांनाही हे प्रशिक्षण देण्यात आले. याप्रसंगी नीलिमा पवार, डॉ. प्रदीप बर्डे, डॉ. मृणाल पाटील आदींची उपस्थिती होती.



दि. 2/8/2015
गांवकरी

# आरोग्य विभाग कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण




। नाशिक। सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी मराठा विद्या प्रसारक समाजाच्या सरचिटणीस नीलिमा पवार, डॉ. प्रदीप बढे, डॉ गौरी दिवाण.

। नाशिक ।

मविप्रच्या डॉ वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्यावतीने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या ५ जिल्ह्यातील वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले असून, जिल्ह्याच्या आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांनाही हे प्रशिक्षण देण्यात येत आहे .

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या सरचिटणीस नीलिमा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला . प्रशिक्षणाचे समन्वयक डॉ प्रदीप बढे यांनी प्रास्ताविक करून स्वागत केले. महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ मृणाल पाटील यांनी रुग्णालयाची माहिती देऊन रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विविध रुग्ण सुविधा, सवलती व निष्णात डॉक्टरांची रुग्ण सेवा शहर व जिल्ह्यातील सर्वसामान्यांसह गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहोचवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले .

सरचिटणीस नीलिमा पवार यांनी संजीवनी २ बीएलएस हे प्रशिक्षण कुंभमेळ्या व्यतिरिक्त दैनंदिन कामकाज करताना निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी ठरणार असल्याचे सांगितले. डॉ सुनील औंधकर यांनी स्त्रीरोग विभागाच्यावतीने मविप्र रुग्णालयात रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधांची माहिती दिली. प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. प्रदीप बढे, डॉ गौरी दिवाण यांनी आपत्कालीन परिस्थितीत प्रत्यक्ष काय करावे याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली तर डॉ. बालाजी उगलमले यांनी कुंभमेळ्यात आरोग्याविषयी समस्यांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी माहिती दिली. यावेळी राज्य आरोग्य सेवेचे डॉ. श्रीराम गोसावी, आरोग्य सेवा विभागाच्या प्रशिक्षण केंद्राच्या गायकवाड, गणाडे उपस्थित होत्या. या प्रशिक्षणात आरोग्य सेवा विभागांतर्गत येणाऱ्या एएनएम, एलएचव्ही बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी सहभागी झाले.

दि. 2/8/2015
देशदुत

# डॉ. पवार महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**नाशिक ।** मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्यसेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणात नाशिकसह धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या ५ जिल्ह्यांतील वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले होते. जिल्ह्याच्या आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांनाही हे प्रशिक्षण देण्यात आले. याप्रसंगी नीलिमा पवार, डॉ. प्रदीप बर्डे, डॉ. मृणाल पाटील आदींची उपस्थिती होती.



लोकमत - 5/8/2015

**आपत्ती व्यवस्थापन : आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना अद्ययावत प्रशिक्षण**

# आरोग्यसेविका देणार तातडीच्या सेवा



आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणप्रसंगी सीपीआर प्रात्यक्षिकाची पाहणी करताना अमेरिकेचे डॉ. सागर गळवणकर, अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील, डॉ. प्रदीप बर्डे आदि.

**कसबे सुकेणे :** तत्काळ उपचाराअभावी राज्यातील आदिवासी दुर्गम भागातील रुग्णांना कधी कधी जीव गमवावा लागतो. तशा घटनाही घडल्या आहेत. परंतु नाशिक कुंभमेळ्याच्या निमित्ताने देण्यात येणाऱ्या आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणामुळे आता दुर्गम भागातील आरोग्यसेविकांसह कर्मचारी सीपीआरसारख्या तातडीच्या वैद्यकीय मदतीसाठी सज्ज झाले आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या आरोग्य सेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे अद्ययावत प्रशिक्षण मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात देण्यात आले.

विभागातील नाशिकसह धुळे, जळगाव आणि नंदुरबार येथील ग्रामीण, शहरी व विशेषत: आदिवासी भागातील आरोग्य कर्मचारी व सेवकांना हे प्रशिक्षण दिल्याने कुंभमेळ्याच्या व्यतिरिक्त त्या त्या भागातील आरोग्यसेवेला प्रशिक्षित मनुष्यबळ लाभणार आहे.

आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात मविप्रच्या सरचिटणीस नीलिमा पवार यांच्या हस्ते या प्रशिक्षणाचा प्रारंभ झाला तर समारोपाला अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ फ्लोरिडा येथील इमर्जन्सी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सागर गळवणकर यांनी भेट देऊन संवाद साधला.

प्रारंभी अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी डॉ. सागर गळवणकर यांचे स्वागत केले. समन्वयक डॉ. प्रदीप बर्डे यांनी प्रास्ताविक केले. एप्रिल महिन्यात मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सीडीसी अटलांटा व इडसईम यांच्या सहयोगातून तीन स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा झाली होती. त्याचाच पुढचा टप्पा म्हणून सुरू असलेल्या विविध स्तरावरील प्रशिक्षणाचा आढावा डॉ. गळवणकर यांनी घेतला. तत्पूर्वी त्यांनी महाविद्यालयातील विविध विभागांच्या प्रमुखांशी संवाद साधला.

यावेळी महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी महाविद्यालयाची माहिती दिली. याप्रसंगी डॉ. प्रीती बजाज, डॉ. जितेंद्र सिंग आदि उपस्थित होते. (वार्ताहर)

### काय आहे सीपीआर

- एखाद्या व्यक्तीचे हृदय आणि श्वास बंद पडलेला असताना तो पूर्ववत करण्यासाठी केली जाणारी तातडीची वैद्यकीय मदत म्हणजे सीपीआर. यामध्ये विशिष्ट पध्दतीने छाती दाबून कार्डियाक मसाज, कृत्रिम श्वास व उपलब्ध असल्यास हृदयाला इलेक्ट्रिक शॉक देणाऱ्या मशीनने एईडी शॉक दिले जातात, या पद्धतीस सीपीआर असे म्हणतात.

लोकसत्ता ८/४/२०१५

## आप्तकालीन व्यवस्थापन प्रशिक्षण

नाशिक येथील मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्यावतीने सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर, कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यात नाशिकसह, धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या पाच जिल्ह्यातील वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी संस्थेच्या सरचिटणीस नीलिमा पवार आणि महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील उपस्थित होत्या. 'मॅनेजमेंट २ थ्रीप्लस' हे प्रशिक्षण कुंभमेळ्याव्यतिरिक्त दैनंदिन उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी पडणार असल्याचे पवार यांनी सांगितले. डॉ. सुनील औंधकर, डॉ. प्रदीप बर्डे, डॉ. गौरी दिवाण आदी उपस्थित होते.

पुढारी दि० 4/8/15

# आरोग्य कर्मचाऱ्यांनी गिरविले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**कॉलेजरोड : वार्ताहर**

मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणात नाशिकसह धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या पाच जिल्ह्यांतील वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले होते. जिल्ह्याच्या आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांनाही हे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

यावेळी मविप्रच्या सरचिटणीस नीलिमा पवार या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्रशिक्षणाचे समन्वयक डॉ. प्रदीप बर्डे यांनी प्रास्ताविक करून स्वागत केले. महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी जिल्ह्यातील सर्वसामान्यांसह गरजू गरीब रुग्णांपर्यंत उपचारसेवा पोहोचविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन पाटील यांनी यावेळी केले.

प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. प्रदीप बर्डे, डॉ. गौरी दिवाण यांनी आपत्कालीन परिस्थितीत प्रत्यक्ष काय करावे, याची उपस्थितांना प्रात्यक्षिकासह माहिती दिली तर डॉ. बालाजी आलमले यांनी कुंभमेळ्यात आरोग्याविषयी समस्यांचे प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी माहिती दिली. या प्रसंगी रासेयोचे डॉ. श्रीराम गोसावी, उपस्थित होते.

लोकसत्ता दि. ४/८/१५

# आप्तकालीन व्यवस्थापन प्रशिक्षण

नाशिक येथील मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्यावतीने सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर, कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यात नाशिकसह, धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या पाच जिल्ह्यातील वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी संस्थेच्या सरचिटणीस नीलिमा पवार आणि महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील उपस्थित होत्या. 'संजीवनी २ बीएलएस' हे प्रशिक्षण कुंभमेळ्याव्यतिरिक्त दैनंदिन उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी पडणार असल्याचे पवार यांनी सांगितले. डॉ. सुनील औंधकर, डॉ. प्रदीप बर्डे, डॉ. गौरी दिवाण आदी उपस्थित होते.

पुढारी ५/८/२०१५

# आरोग्य कर्मचाऱ्यांनी गिरविले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**कॉलेजरोड : वार्ताहर**

मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणात नाशिकसह धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या पाच जिल्ह्यातील वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले होते. जिल्ह्याच्या आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांनाही हे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

यावेळी मविप्रच्या सरचिटणीस नीलिमा पवार या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्रशिक्षणाचे समन्वयक डॉ. प्रदीप बर्डे यांनी प्रास्ताविक करून स्वागत केले. महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी जिल्ह्यातील सर्वसामान्यांसह गरजू गरीब रुग्णांपर्यंत उपचारसेवा पोहोचविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन पाटील यांनी यावेळी केले.

प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. प्रदीप बर्डे, डॉ. गौरी दिवाण यांनी आपत्कालीन परिस्थितीत प्रत्यक्ष काय करावे, याची उपस्थितांना प्रात्यक्षिकासह माहिती दिली तर डॉ. बालाजी आलमले यांनी कुंभमेळ्यात आरोग्याविषयी समस्यांचे प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी माहिती दिली. या प्रसंगी रासेयोचे डॉ. श्रीराम गोसावी, उपस्थित होते.

लोकमत - 5/8/2015

### आपत्ती व्यवस्थापन : आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना अद्ययावत प्रशिक्षण

# आरोग्यसेविका देणार तातडीच्या सेवा

कसबे सुकेणे : तत्काळ उपचारांअभावी राज्यातील आदिवासी दुर्गम भागातील रुग्णांना कधी कधी जीव गमवावा लागतो. तशा घटनाही घडल्या आहेत. परंतु नाशिक कुंभमेळ्याच्या निमित्ताने देण्यात येणाऱ्या आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणामुळे आता दुर्गम भागातील आरोग्यसेविकांसह कर्मचारी सीपीआरसारख्या तातडीच्या वैद्यकीय पद्धतीसाठी सज्ज झाले आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या आरोग्य सेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे अद्ययावत प्रशिक्षण मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात देण्यात आले.

विभागातील नाशिकसह धुळे, जळगाव आणि नंदुरबार येथील ग्रामीण, शहरी व विशेषत: आदिवासी भागातील आरोग्य कर्मचारी व सेवकांना हे प्रशिक्षण दिल्याने कुंभमेळ्याच्या व्यतिरिक्त त्या त्या भागातील आरोग्यसेवेला प्रशिक्षित मनुष्यबळ लाभणार आहे.

आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात मविप्रच्या सरचिटणीस नीलिमा पवार यांच्या हस्ते या प्रशिक्षणाचा प्रारंभ झाला तर समारोपाला अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ फ्लोरिडा येथील इमर्जन्सी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सागर गळवणकर यांनी भेट देऊन संवाद साधला.



आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणप्रसंगी सीपीआर प्रात्यक्षिकाची पाहणी करताना अमेरिकेचे डॉ. सागर गळवणकर, अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील, डॉ. प्रदीप बर्डे आदि.

प्रारंभी अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी डॉ. सागर गळवणकर यांचे स्वागत केले. समन्वयक डॉ. प्रदीप बर्डे यांनी प्रास्ताविक केले. एप्रिल महिन्यात मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सीडीसी अटलांटा व इंडसईम यांच्या सहयोगातून तीन स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा झाली होती. याचाच पुढचा टप्पा म्हणून सुरू असलेले विविध स्तरावरील प्रशिक्षणाचा आढावा डॉ. गळवणकर यांनी घेतला. तत्पूर्वी त्यांनी महाविद्यालयातील विविध विभागांच्या प्रमुखांशी संवाद साधला.

यावेळी महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी महाविद्यालयाची माहिती दिली. याप्रसंगी डॉ. प्रीती बजाज, डॉ. जितेंद्र सिंग आदि उपस्थित होते. (वार्ताहर)

## काय आहे सीपीआर

- एखाद्या व्यक्तीचे हृदय आणि श्वास बंद पडलेला असताना तो पूर्ववत करण्यासाठी केली जाणारी तातडीची वैद्यकीय मदत म्हणजे सीपीआर. यामध्ये विशिष्ट पद्धतीने छाती दाबून कार्डियाक मसाज, कृत्रिम श्वास व उपलब्ध असल्यास हृदयास इलेक्ट्रिक शॉक देणाऱ्या मशीनने एईडी शॉक दिले जातात, या पद्धतीस सीपीआर असे म्हणतात.

...े विविध संस्कृत स्पर्धेचे
...ी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना
संकटनिरसन गणपती स्तोत्र,
पाचवी-सहावीसाठी गणपती
गटासाठी कथाकथन स्पर्धा,
असून त्यासाठी विद्यार्थ्यां
... व्यायामस्य महत्त्वम् आणि
...त आले आहे. ११ वी व
पाठांतर, खुल्या गटासाठी
...त्र पाठांतर अपेक्षित आहे.
... व प्रवेशिका पाठविण्यासाठी
...काळा, देवी मंदिराच्या वरती,

## ...व्रवचनमाला

...िनि ७ ते ९ ऑगस्ट या
... उत्सवाचे आयोजन करण्यात
...हा कार्यक्रम होईल.
...ाचा महामेरू' या विषयावर
...यांचे शिवचर पद्धतीतील
...रण्यात आली आहे.
...रपर्यंत निबंध पाठवावेत.
...े आवाहन आयोजकांनी केले

...राठी भाषेतील पारंपरिक
...न
...र आहे. यावेळी आ. गिरीश
...गार आहेत. गंगापूर रस्त्यावरील
...ास नागरिकांनी उपस्थित राहावे

## ...त्रीदिन साजरा

...ावतीने मैत्री दिन उत्साहात
...ीर महिला मंडळ तयार

# सिंहस्थासाठी शैक्षणिक संस्थांचेही योगदान

प्रतिनिधी, नाशिक

**सिंहस्थ कुंभमेळ्याचे** आयोजन नीटनेटके होण्यासाठी प्रशासनाच्या वतीने सर्व प्रकारची काळजी घेण्यात येत असताना त्यांना शहर व जिल्ह्यातील विविध संस्था, संघटनांकडून सहाय्य मिळत आहे. त्यात शैक्षणिक संस्थांचे योगदान अधिक प्रमाणात असून आपत्ती व्यवस्थापासून तर स्वच्छता अभियानापर्यंत ते विस्तारलेले आहे. कुंभमेळ्यात एखादी आपत्ती निर्माण झाल्यास प्रशासनास त्वरेने कशा प्रकारे सहकार्य करण्यात येईल, याविषयी या संस्थांच्या वतीने कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ. वसंत पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात नाशिकसह धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या पाच जिल्ह्यातील वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

जिल्ह्यातील आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांनाही हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. संस्थेच्या सरचिटणीस निलिमा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रशिक्षणाला सुरुवात करण्यात आली. प्रशिक्षणाचे समन्वयक डॉ. प्रदीप बर्डे यांनी प्रास्ताविक केले. महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी रुग्णालयात उपलब्ध विविध रुग्ण सुविधा, सवलती व निष्णात डॉक्टरांची रुग्णसेवा शहर व जिल्ह्यातील गरजूंपर्यंत पोहचविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. निलिमा पवार यांनी 'संजीवन-२ बीएलएस' हे प्रशिक्षण कुंभमेळाव्यतिरिक्त दैनंदिन कामकाज करताना निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीतही उपयोगात येणार असल्याचे नमूद केले. डॉ. सुनील औंधकर यांनी स्त्री रोग विभागाच्या वतीने मविप्र रुग्णालयात रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधांची माहिती दिली. डॉ. प्रदीप बर्डे, डॉ. गौरी दिवाण यांनी आपत्कालीन परिस्थितीत प्रत्यक्ष काय करावे, याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली. डॉ. बालाजी आलमले यांनी कुंभमेळ्यात आरोग्यविषयक समस्यांची प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी माहिती दिली.

वाडिवऱ्हे नाशिक ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ब्रह्मा व्हॅली महाविद्यालयात 'कुंभमेळा योगदान' या प्रकल्पाचे उद्घाटन निर्मला खर्डे व संस्थेचे शिक्षणाधिकारी विजय तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

खर्डे यांनी विद्यार्थ्यांना संस्कृतीचे जतन करण्याचा तसेच कुंभमेळ्यात वृद्ध व्यक्तींना सहकार्य करण्याचा सल्ला दिला. कुंभमेळा येताना खूप काही घेऊन येतो, तर जाताना खूप काही देऊन जातो, असेही त्या म्हणाल्या. शिक्षण अधिकारी तांबे यांनी विद्यार्थ्यांना कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्याचे आवाहन करतानाच स्वच्छतेची सुरुवात विद्यार्थ्यांनी स्वतःपासून करण्याची सूचना केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूराव देसाई यांनी कुंभमेळ्यात 'मेक इन ... व्हॅली' म्हणून महाविद्यालया... राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची मा... दिली.

मराठी, हिंदी, इंग्रजी भा... पर्यावरण प्रदूषणाचे तसेच भार... संस्कृतीचे सर्वेक्षण, साधुग्राम वि... भेट, कुंभमेळ्यातील शाही स्ना... होणाऱ्या पाण्याच्या प्रदूषणाचा अभ्... असे कार्यक्रम वर्षभर महाविद्याल... वतीने राबविण्यात येणार आ... कुंभमेळ्यात महाविद्यालया... रसायनशास्त्र विभागाद्वारे विभागप्र... प्रा. नीलेश जाधव हे गोदावरी... प्रदूषणाचा या पद्धतीने अभ्यास क... आहेत. सूत्रसंचालन प्रा. मोनाली ... यांनी केले.



...'केसर स्मार्ट कॉलेज अवॉर्ड २०१५'

## अल्पवयीन मुलीकडून वेश्या व्यवसाय; सहा जणांना अटक

मनमाड

**अल्पवयीन मुलीस** बळजबरीने वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या सहा जणांना शहर पोलिसांनी अटक केली आहे. येथील सरदार पटेल रस्त्यावरील एका दुमजली इमारतीत हा प्रकार घडला. पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीनुसार अफसाना साबीर शेख, हसिना साबीर शेख, परिना शहाबुद्दीन

# महाले, सावळे यांना 'लुई ब्रेल सन्मान'



विविध संस्कृत स्पर्धेचे
ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना
किटनिरसन गणपती स्तोत्र,
ाचवी-सहावीसाठी गणपती
टासाठी कथाकथन स्पर्धा,
सून त्यासाठी विद्यार्थ्यां
ग्रायामस्य महत्तम् आणि
। आले आहे. ११ वी व
ावतंर, खुल्या गटासाठी
पाठांतर अपेक्षित आहे.
। प्रवेशिका पाठविण्यासाठी
ाडा, देवी मंदिराच्या मागे,

# वचनमाला

। ७ ते ९ ऑगस्ट या
ालाचे आयोजन करण्यात
कार्यक्रम होईल.
या महामेरू' या विषयावर
चे शिवपर पद्धतील
यात आली आहे.
र्वात निबंध पाठवावेत.
आवाहन आयोजकांनी केले

ठी भाषेतील पारंपरिक

आहे. यासंदर्भी आ. गिरीश
र आहेत. गंगापूर रस्त्यावरील
। नागरिकांनी उपस्थित रहावे

# ोदिन साजरा

वतीने मैत्री दिन उत्साहात
। महिला मंडळ तवार

# सिंहस्थासाठी शैक्षणिक संस्थांचेही योगदान

प्रतिनिधी, नाशिक

**सिंहस्थ कुंभमेळ्याचे** आयोजन नीटनेटके होण्यासाठी प्रशासनाच्या वतीने सर्व प्रकारची काळजी घेण्यात येत असताना त्यांना शहर व जिल्ह्यातील विविध संस्था, संघटनांकडून सहाय्य मिळत आहे. त्यात शैक्षणिक संस्थांचे योगदान अधिक प्रमाणात असून आपत्ती व्यवस्थापासून तर स्वच्छता अभियानापर्यंत ते विस्तारलेले आहे. कुंभमेळ्यात एखादी आपत्ती निर्माण झाल्यास प्रशासनास त्वरेने कशा प्रकारे सहकार्य करण्यात येईल, याविषयी या संस्थांच्या वतीने कर्मचाऱ्यांना प्रशिक्षितही करण्यात आले आहे.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ. वसंत पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात नाशिकसह धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या पाच जिल्ह्यातील वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

जिल्ह्यातील आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांनाही हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. संस्थेच्या सरचिटणीस निलिमा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रशिक्षणाला सुरुवात करण्यात आली. प्रशिक्षणाचे समन्वयक डॉ. प्रदीप बर्डे यांनी प्रास्तविक केले. महाविद्यालयाच्या

सिंहस्थ कुंभमेळा
२०१५ - २०१६

अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी रुग्णालयात उपलब्ध विविध रुग्ण सुविधा, सवलती व निष्णात डॉक्टरांची रुग्णसेवा शहर व जिल्ह्यातील गरजूंपर्यंत पोहचविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. निलिमा पवार यांनी 'संजीवन-२ बीएलएस' हे प्रशिक्षण कुंभमेळ्याव्यतिरिक्त दैनंदिन कामकाज करताना निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीतही उपयोगात येणार असल्याचे नमूद केले. डॉ. सुनील औंधकर यांनी स्त्री रोग विभागाच्या वतीने मविप्र रुग्णालयात रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधांची माहिती दिली. डॉ. प्रदीप पर्डे, डॉ. गौरी दिवाण यांनी आपत्कालीन परिस्थितीत प्रत्यक्ष काय करावे, याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली. डॉ. बालाजी आलमले यांनी कुंभमेळ्यात आरोग्यविषयक समस्यांची प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी माहिती दिली.

याशिवाय नाशिक ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ब्रह्मा व्हॅली महाविद्यालयात 'कुंभमेळा योगदान' या प्रकल्पाचे उद्घाटन निर्मला खर्डे व संस्थेचे शिक्षणाधिकारी विजय तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

खर्डे यांनी विद्यार्थ्यांना संस्कृतीचे जतन करण्याचा तसेच कुंभमेळ्यात वृद्ध व्यक्तींना सहकार्य करण्याचा सल्ला दिला. कुंभमेळा येताना खूप काही घेऊन येतो, तर जाताना खूप काही देऊन जातो, असेही त्या म्हणाल्या. शिक्षण अधिकारी तांबे यांनी विद्यार्थ्यांना कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्याचे आवाहन करतानाच स्वच्छतेची सुरुवात विद्यार्थ्यांनी स्वतःपासून करण्याची सूचना केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूराव देसाई यांनी कुंभमेळ्यात 'मेक इन ब्रह्मा व्हॅली' म्हणून महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

मराठी, हिंदी, इंग्रजी भाषां पर्यावरण प्रदूषणाचे तसेच भारतीय संस्कृतीचे सर्वेक्षण, साधुग्राम भेट, कुंभमेळ्यातील शाही स्नान होणाऱ्या पाण्याच्या प्रदूषणाचा अभ्यास असे कार्यक्रम वर्षभर महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात येणार आहे. कुंभमेळ्यात महाविद्यालयाती रसायनशास्त्र विभागाद्वारे विभागप्रमुख प्रा. नीलेश जाधव हे गोदावरीच्या प्रदूषणाचा या पद्धतीने अभ्यास करणार आहेत. सूत्रसंचालन प्रा. मीनाक्षी घ यांनी केले.



संदिप गांधी राष्ट्रीय मराठा विद्यापीठाच्या पुणे विभागातर्फे दिला जाणारा प्रतिष्ठा 'बेस्ट मराठी सेंटर अवॉर्ड २०१५'

# अल्पवयीन मुलीकडून वेश्या व्यवसाय; सहा जणांना अटक

मनमाड

अल्पवयीन मुलीस बळजबरीने वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या सहा जणांना शहर पोलिसांनी अटक केली आहे. येथील सरदार पटेल रस्त्यावरील एक दुमजली इमारतीत हा प्रकार घडला. पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीनुसार अफसाना साबीर शेख, हसीना साबीर शेख, जरीना शहाबुद्दीन

# महाले, सावळे यांना 'लुई ब्रेल सन्मान'



लोकसत्ता - 5/8/2015

वृ | त्ता | न्त

# सिंहस्थासाठी शैक्षणिक संस्थ

प्रतिनिधी, नाशिक

सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन नीटनेटके होण्यासाठी प्रशासनाच्या वतीने सर्व प्रकारची काळजी घेण्यात येत असताना त्यांना शहर व जिल्ह्यातील विविध संस्था, संघटनांकडून सहाय्य मिळत आहे. त्यात शैक्षणिक संस्थांचे योगदान अधिक प्रमाणात असून आपत्ती व्यवस्थापासून तर स्वच्छता अभियानापर्यंत ते विस्तारलेले आहे. कुंभमेळ्यात एखादी आपत्ती निर्माण झाल्यास प्रशासनास त्वरेने कशा प्रकारे सहकार्य करण्यात येईल, याविषयी या संस्थांच्या वतीने कर्मचाऱ्यांना प्रशिक्षितही करण्यात आले आहे.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ. वसंत पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात नाशिकसह धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या पाच जिल्ह्यातील वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

जिल्ह्यातील आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांनाही हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. संस्थेच्या सरचिटणीस निलिमा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रशिक्षणाला सुरुवात करण्यात आली. प्रशिक्षणाचे समन्वयक डॉ. प्रदीप घर्डे यांनी प्रास्ताविक केले. महाविद्यालयाच्या

सिंहस्थ कुंभमेळा
२०१५ - २०१६

अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी रुग्णालयात उपलब्ध विविध रुग्ण सुविधा, सवलती व निष्णात डॉक्टरांची रुग्णसेवा शहर व जिल्ह्यातील गरजूंपर्यंत पोहचविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. निलिमा पवार यांनी 'संजीवन-२ बीएलएस' हे

प्रशिक्षण कुंभमेळ्याव्यतिरिक
कामकाज करताना निर्माण
आपत्कालीन परिस्थितीतही
येणार असल्याचे नमूद के
सुनील औंधकर यांनी
विभागाच्या वतीने मविप्र रु
रुग्णांना दिल्या जाणाऱ्या
सुविधांची माहिती दिली.
पडे, डॉ. गौरी दिवाण
आपत्कालीन परिस्थितीत प्र
करावे, याची प्रात्यक्षिकास
दिली. डॉ. बालाजी आल
कुंभमेळ्यात आरोग्यविषयक
प्रतिबंधात्मक उपाययोजना
माहिती दिली.

याशिवाय नाशिक ग्रामीण
प्रसारक मंडळ संचलित ब्र




इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या पुणे विभागातर्फे दिला जाणारा पहिला 'बेस्ट स्टडी सेंटर अवॉर्ड २०१५' विद्यापीठाच्या नाशिक येथील केटीएचएम महाविद्यालयातील अभ्यास केंद्रास मिळाला आहे. पुरस्कारासह मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सरचिटणीस निलीमा पवार, केंद्र समन्वयक डॉ. आर. डी. दरेकर, संस्थेचे अध्यक्ष प्रतापदादा सोनवणे, ॲड. नितीन ठाकरे, आदी.

लोकमत 5/8/15

# कुंभमेळ्यासाठी 'मविप्र'ने दिले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

## डॉ. पवार वैद्यकीय महाविद्यालयात प्रशिक्षण



**कसबे सुकेणे : वार्ताहर**

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्वच स्तरावर यंत्रणा सज्ज होत आहे. यंदाच्या कुंभमेळ्यासाठी आरोग्य सेवा विभागाने नाशिक विभागातील चार जिल्ह्यांतील आरोग्य सेवकांना प्रशिक्षित करण्यात आले असून, डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात झालेल्या या प्रशिक्षणात अमेरिकेतील 'इंडसईएम' व 'सीडीसी'चे डॉ. सागर गळवणकर यांनी संवाद साधत प्रशिक्षणाचे कौतुक केले.

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा विभागाच्या कर्मचाऱ्यांना सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात नाशिकसह धुळे, जळगाव, नंदुरबार व नगर या पाच जिल्ह्यांतील वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले असून, विशेष म्हणजे जिल्ह्याच्या आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांनाही हे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या सरचिटणीस नीलिमा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. प्रशिक्षणाच्या समारोप सत्रास अमेरिकेतील इंडसईएम व सीडीसीचे डॉ. सागर गळवणकर यांनी संवाद साधत मार्गदर्शन केले. प्रशिक्षण देणाऱ्या टीमचे कौतुक केले. प्रारंभी महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी गळवणकर यांचा सत्कार केला. प्रशिक्षणाचे समन्वयक डॉ. प्रदीप बर्डे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मृणाल पाटील यांनी मविप्र रुग्णालयाची माहिती देऊन रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विविध रुग्ण सुविधा, सवलती व निष्णात डॉक्टरांची रुग्णसेवा शहर व जिल्ह्यातील सर्वसामान्यांसह गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहोचविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. डॉ. प्रदीप बर्डे, डॉ. बालाजी आलमले व डॉ. गौरी दिवाण आणि प्रशिक्षक विद्यार्थी टीमने आपत्कालीन परिस्थितीत प्रत्यक्ष काय करावे, याची माहिती देत प्रात्यक्षिक दाखविले.

### दुर्गम भागात देणार तातडीची सेवा

प्रशिक्षणासाठी डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या केंद्रीय संशोधन प्रयोगशाळेत अद्ययावत यंत्रणा उपलब्ध केली आहे. एखाद्या व्यक्तीचे हृदय आणि श्वास बंद पडलेला असताना तो पूर्ववत करण्यासाठी केली जाणारी तातडीची वैद्यकीय मदत म्हणजे 'सीपीआर' यामध्ये विशिष्ट पद्धतीने छाती दाबून कार्डियाक मसाज, कृत्रिम श्वास व उपलब्ध असल्यास हृदयास इलेक्ट्रिक शॉक देणाऱ्या मशीनने एईडी शॉक दिले जातात. या पद्धतीस सीपीआर असे म्हणतात. या पद्धतीचे सहभागी आरोग्य सेविकांना प्रशिक्षण देण्यात आल्याने हे आरोग्यसेवक आता कुंभमेळ्याव्यतिरिक्त आदिवासी व दुर्गम भागातही ही तातडीची सेवा देण्यासाठी या प्रशिक्षणातून तयार झाले आहे. विशेष बाब म्हणजे या प्रशिक्षणात अत्याधुनिक स्वयंचलित सीपीआर ऑटो पल्स मशीनचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले.



आडगाव : डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणात सीपीआर प्रात्यक्षिकाची पाहणी करताना अमेरिकेतील डॉ. सागर गळवणकर, डॉ. मृणाल पाटील, डॉ. प्रदीप बर्डे, डॉ. बालाजी आलमले, डॉ. गौरी दिवाण आदी.

(छाया : योगेश सगर)

ीर्थ म्हणून
ाणी, देश-
रे भाविक
ीनासायास
; यासाठी
उत्पादकाने
ला करून
कमंडलूला
आहे.
मातादी
टील यांनी
उपलब्ध
ग्रात दहा
होतील,
हे. लहान
रुपयांना,
रुपयांना
वेकांनीही
ी आहे.
कमंडलू

पुण्यनगरी दि. 12/8/15

# आपत्ती व्यवस्थापनासाठी वैद्यकीय महाविद्यालय सज्ज




नाशिक, दि. ११ (प्रतिनिधी)- येथील डॉ वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाने कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाची केलेली सज्जता उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन अमेरिकेतील इंडस ईएम व सिडीसीचे डॉ. सागर गळवणकर यांनी केले.

आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात दि २७ व २८ एप्रिल रोजी घेण्यात आलेल्या सीडीसी आणि इंडसईएम च्या आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या पुढील प्रगतीचा आढावा डॉ. गळवणकर यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते. अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी डॉ. गळवणकर यांचे स्वागत केले. त्यानंतर डॉ. पाटील यांनी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन व महाविद्यालयाची पूर्वतयारी याविषयी माहिती देताना सांगितले की, सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात १५० सर्वसामान्य खाटा, २० अतिदक्षता खाटा आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये २४ तास आपत्कालीन सेवा उपलब्ध राहणार आहे. तसेच २५ प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स हे स्वयंसेवी संस्थांच्या रुग्णसेविका व आरोग्य सेवा केंद्रात पर्वणीकाळात नियुक्त करण्यात आले आहेत. शासनाच्या विनंतीनुसार डॉक्टरांची तपोवन, साधुग्राम, इंदिरा गांधी रुग्णालय, जिल्हा रुग्णालयात नियुक्ती करण्यात आली आहे.

## यंदाही होणार स्वयंसेवक उपलब्ध

कुंभमेळा काळात वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयाची सुसज्ज आपत्कालीन सेवा, तसेच एमईटी व एनएसएसने स्वयंसेवक गेल्या कुंभमेळ्याप्रमाणे यंदाही उपलब्ध करून दिले जातील.

- नीलिमा पवार, सरचिटणीस

गावकरी :- 12|8|15

| शहर- जिल्हा |

# कुंभमेळ्यातील आपत्ती व्यवस्थापनासाठी डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय सज्ज

। नाशिक ।

सामाजिक व आरोग्य कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या डॉ वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाने कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाची केलेली सज्जता उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन अमेरीकेतील इंडसईएम व सिडीसीचे डॉ सागर गळवणकर यांनी व्यक्त केले.

आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात दि. २७ व २८ एप्रिल रोजी घेण्यात आलेल्या सीडीसी आणि ईएसईएम च्या आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या पुढील प्रगतीचा आढावा डॉ. गळवणकर यांनी घेतला , त्यावेळी ते बोलत होते. अधिष्ठाता डॉ मृणाल पाटील यांनी डॉ. गळवणकर यांचे स्वागत केले त्यानंतर डॉ पाटील यांनी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन व महाविद्यालयाची पूर्वतयारी याविषयी माहिती देताना सांगितले की, सिंहस्थ कुंभ व्यवस्थेसाठी मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात १५० सर्वसामान्य खाटा, २० आयसीयू खाटा आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये २४ तास आपत्कालीन सेवा उपलब्ध राहणार आहे. तसेच २५ प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स हे स्वयंसेवी संस्थांच्या रुग्णवाहिका व आरोग्य सेवा केंद्रात पर्वणीकाळात नियुक्त करण्यात आले आहे. याशिवाय निवासी डॉक्टरांची तपोवन, साधुग्राम, इंदिरा गांधी रुग्णालय, जिल्हा रुग्णालय येथे नियुक्ती करण्यात आली आहे. वैद्यकीय मदतीबरोबरच संशोधनाचे म हत्त्व लक्षात घेऊन कुंभमेळ्यादरम्यान विविध संशोधन प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. जेणेकरून या कुंभमेळ्यातील सर्व अनुभव भविष्यात होणाऱ्या कुंभमेळ्याच्या आपत्ती व आरोग्य व्यवस्थापनासाठी मार्गदर्शक ठरेल असे नियोजन करण्यात आले आहे.

आपत्ती काळात आवश्यक रक्तसाठा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने पहिल्या शाही स्नानाच्या ४ दिवस अगोदर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे . तसेच क्रमांक १५० हा उपक्रम राबविला जात असून यामध्ये ज्याचा वाढदिवस असेल तो विद्यार्थी किंवा व्यक्ती रक्तदान करून उपक्रमात सहभागी होणार असल्याची माहिती डॉ मृणाल पाटील यांनी दिली .

> "हरित कुंभमेळा ही संकल्पना लक्षात घेत मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने सामाजिक दातृत्व निभावण्यासाठी डॉ.वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या मदतीने गोदावरी स्वच्छता मोहीम यापूर्वी राबविली असून कुंभमेळा काळात वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयाची सुसज्ज आपत्कालीन सेवा तसेच रासेयो व एन सी सी चे स्वयंसेवक गेल्या कुंभमेळ्याप्रमाणे यंदाही उपलब्ध करून दिले जातील .
>
> – श्रीमती निलीमाताई पवार (सरचिटणीस )

सकाळ - 12/8/2015

# डॉ. वसंतराव पवार महाविद्यालयातर्फे सिंहस्थासाठी दीडशे खाटा आरक्षित

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ११ : कुंभमेळ्यासाठी डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात १५० सर्वसामान्य खाटा, २० आयसीयू खाटा आरक्षित करण्यात आल्या आहेत. यात २४ तास आपत्कालीन सेवा उपलब्ध असेल अशी माहिती अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांनी दिली.

महाविद्यालयात सीडीसी आणि ईसईसच्या आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या पुढील प्रगतीचा आढावा डॉ. गळवणकर यांनी घेतला. वैद्यकीय महाविद्यालयाने कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाची केलेली सज्जता उल्लेखनीय असल्याचे मत अमेरिकेतील इंडस ईएम व सीडीसीचे डॉ. सागर गळवणकर यांनी व्यक्त केले. अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील म्हणाल्या, की २५ प्रशिक्षणार्थी डॉक्टर हे स्वयंसेवी संस्थांच्या रुग्णसेविकांसह आरोग्य सेवा केंद्रात पर्वणीकाळात नियुक्त करण्यात आले आहेत. कुंभमेळ्यादरम्यान विविध संशोधन प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. आपत्ती काळात आवश्यक रक्तसाठा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने पहिल्या शाहीस्नानाच्या चार दिवस अगोदर रक्तदान शिबिर आयोजित केले जाईल. तसेच, 'ब्लड ३५०' हा उपक्रम राबविला जात असल्याची माहिती डॉ. पाटील यांनी दिली. कुंभमेळा काळात वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयाची सुसज्ज आपत्कालीन सेवा, तसेच राष्ट्रीय सेवा योजना व 'एनसीसी'चे स्वयंसेवक गेल्या कुंभमेळ्याप्रमाणे यंदाही उपलब्ध करून दिले जातील, असे 'मविप्र' संस्थेच्या सरचिटणीस नीलिमा पवार म्हणाल्या.

देशदूत - 12/8/2015

# पवार महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन उल्लेखनीय – गळवणकर



**नाशिक । दि. ११ प्रतिनिधी**

सामाजिक व आरोग्य कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाने कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाची केलेली सज्जता उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन अमेरिकेतील 'इएसईएम' व 'सिडीसीचे' डॉ. सागर गळवणकर यांनी केले.

आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात दि १४ व २८ एप्रिल रोजी घेण्यात आलेल्या सीडीसी आणि ईएसईएमच्या आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेनंतर पुढील प्रगतीचा आढावा डॉ. गळवणकर यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील उपस्थित होते. डॉ. पाटील यांनी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन व महाविद्यालयाची पूर्वतयारी याविषयी माहिती त्यांना सांगितले. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी मविप्रच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात सर्वसामान्य १५० खाटा आणि २० आयसीयू कक्षातील खाटा आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये २४ तास आपत्कालीन सेवा उपलब्ध राहणार आहे. तसेच २५ प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स हे स्वयंसेवी संस्थांना रुग्णवाहिका व आरोग्य सेवा केंद्रात पर्वणी काळात नियुक्त करण्यात आले आहे. याशिवाय निवासी डॉक्टरांची तपोवन, साधुग्राम, इंदिरा गांधी रुग्णालय, आणि जिल्हा रुग्णालय येथे नियुक्ती करण्यात आली आहे. वैद्यकीय मदतीबरोबरच संशोधनाचे महत्त्व लक्षात घेऊन कुंभमेळादरम्यान विविध संशोधन प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे कुंभमेळ्यातील सर्व अनुभव भविष्यात आपत्ती व आरोग्य व्यवस्थापनासाठी मार्गदर्शक ठरणार आहे. आपत्ती काळात आवश्यक रक्तसाठा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने पहिल्या शाही स्नानाच्या ४ दिवस अगोदर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच 'ब्लड ३५०' हा उपक्रम राबविला जात असून यामध्ये ज्यांचा वाढदिवस असेल तो विद्यार्थी किंवा व्यक्ती रक्तदान करून उपक्रमात सहभागी होणार असल्याची माहिती डॉ. मृणाल पाटील यांनी दिली.

## आपत्कालीन सेवा सज्ज

हरित कुंभमेळा ही संकल्पना लक्षात घेत संस्थेने सामाजिक दातृत्व निभावण्यासाठी डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या मदतीने गोदावरी स्वच्छता मोहीम यापूर्वी राबविली आहे. कुंभमेळा काळात वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयाची सुसज्ज आपत्कालीन सेवा तसेच रासेयो व एनसीसीचे स्वयंसेवक गेल्या कुंभमेळ्याप्रमाणे यंदाही उपलब्ध करून दिले जातील.

—नीलिमा पवार, सरचिटणीस, मविप्र

महाराष्ट्र टाइम्स दि. 12/8/15

# कुंभमेळ्यासाठी मविप्रचे पथक

**नाशिक :** मविप्र महाविद्यालयाच्या रुग्णालयात १५० सर्वसामान्य खाटा, २० आयसीयू खाटा आरक्षित करण्यात आल्या आहेत. यामध्ये २४ तास आपत्कालीन सेवा उपलब्ध राहणार आहे. तसेच २५ प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स हे स्वयंसेवी संस्थांच्या रुग्णसेविका व आरोग्य सेवा केंद्रात पर्वणीकाळात नियुक्त करण्यात आले आहेत.

निवासी डॉक्टरांची तपोवन, साधुग्राम, इंदिरा गांधी रुग्णालय, जिल्हा रुग्णालय येथे नियुक्ती करण्यात आली आहे. वैद्यकीय मदतीबरोबरच संशोधनाचे महत्त्व लक्षात घेऊन कुंभमेळ्यादरम्यान विविध संशोधन प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले आहे. जेणेकरून या कुंभमेळ्यातील सर्व अनुभव भविष्यात होणाऱ्या कुंभमेळ्याच्या आपत्ती व आरोग्य व्यवस्थापनासाठी मार्गदर्शक ठरेल.

लोकसत्ता - 15/8/2015

# कुंभमेळ्यासाठी डॉ. वसंतराव पवार महाविद्यालय सज्ज

नाशिक येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, आपत्कालीन सेवा देण्यासाठी सज्ज झाले आहे. रुग्णालयातील १५० सर्वसामान्य खाटा, २० अतिदक्षता विभागातील खाटा आरक्षित करण्यात आल्या आहेत. त्यात २४ तास आपत्कालीन सेवा उपलब्ध राहणार असून २५ प्रशिक्षणार्थी डॉक्टर हे स्वयंसेवी संस्थांच्या रुग्णसेविका व आरोग्य सेवा केंद्रात पर्वणीकाळात नियुक्त करण्यात आले आहेत. या शिवाय निवासी डॉक्टरांची नियुक्ती साधुग्राम, तपोवन, इंदिरा गांधी रुग्णालय, जिल्हा रुग्णालय येथे करण्यात आली आहे.

पुढारी - 23/8/2015

# आपत्ती व्यवस्थापनासाठी अमेरिकेचा पुढाकार

## डॉ. पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने ऑनलाइन वेबनॉर मार्गदर्शन

**कसबे सुकेणे : वार्ताहर**

नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्याकडे साऱ्या जगाचे खऱ्या अर्थाने लक्ष लागले असल्याचे जाणवत असून, मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने आपत्ती व्यवस्थापनासाठी अमेरिकेतील तज्ज्ञांनी आता पुढाकार घेतला आहे. दरम्यान, बुधवारी सायंकाळी उशिरापर्यंत ऑनलाइन वेबनॉर प्रशिक्षण घेऊन अमेरिकेतील इमोरी विद्यापीठातील तज्ज्ञांनी संवाद साधत मार्गदर्शन केले.

आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात इंडसईएम व सीडीसीने घेतलेल्या कार्यशाळेचा टप्पा म्हणून या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, हैदराबाद दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने पाहणीसाठी रवाना केलेले पथक या सर्व घटनांना अनुसरून नाशिक येथील आरोग्य उपसंचालक कार्यालयात अमेरिकेतील इमोरी विद्यापीठ व सीडीसी अटलांटा आणि डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने वेबनॉर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. अमेरिकेतील इंडसईएम सागर गलवणकर, आरोग्य उपसंचालक बी. पवार, महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील, मविप्र रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजित पाटील, प्रशिक्षक टीमचे डॉ. प्रदीप बर्डे, डॉ. बालाजी आलमले, डॉ. गौरी शिवाण आदी उपस्थित होते.

सकाळ - 26/8/2015




नाशिक : डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात झालेल्या रक्तदान शिबिरप्रसंगी जिल्हाधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, 'मविप्र'च्या सरचिटणीस नीलिमा पवार, अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील, संचालक नाना महाले, शिक्षणाधिकारी प्रा. आर. एम. चौधरी, डॉ. औंधकर आदी.

# 'मविप्र'तर्फे रक्तदान [illegible]

नाशिक, ता. २५ : मराठा विद्याप्रसारक संस्थेने नाशिकच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत मोलाचे योगदान दि[illegible] व्यवस्थापनासाठी 'मविप्र'चा पुढाकार उपयुक्त ठरेल, असे प्रति[illegible] दीपेंद्रसिंह कुशवाह यांनी केले.

संस्थेतर्फे कुंभमेळा आणि राष्ट्रीय क्रीडादिनानिमित्त झालेल्या [illegible] उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. वसंतराव पवार वैद्यकी[illegible] अश्विनी सभागृहात झालेल्या कार्यक्रमास 'मविप्र'च्या सरचिट[illegible] अध्यक्षस्थानी होत्या. या वेळी संचालक नाना महाले, भाऊसाहेब [illegible] डॉ. मृणाल पाटील, शिक्षणाधिकारी प्रा. रामनाथ चौधरी, प्राचा[illegible] प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखासकर, डॉ. बालाजी आलमले, डॉ. [illegible] उपस्थित होते. डॉ. मृणाल पाटील यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षी[illegible] पवार यांनी 'मविप्र'च्या शतकीय वाटचालीचा आढावा घेतला. [illegible] सामाजिक उत्थानास कटिबद्ध राहील, याची ग्वाही दिली.

पुढारी - 26/8/2015

नाशिक
बुधवार, २६ ऑगस्ट २०१५

# सिंहस्थासाठी 'मविप्र'चे महारक्तदान शिबिर



राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मविप्रच्या वैद्यकीय महाविद्यालयात आयोजित महारक्तदान शिबिराप्रसंगी उपस्थित दीपेंद्रसिंह कुशवाह. समवेत नाना महाले, भाऊसाहेब खातळे, डॉ. मृणाल पाटील, नीलिमा पवार, प्रा. रामनाथ चौधरी, प्राचार्य डॉ. महेश मित्रा, प्राचार्य डॉ. जे. डी. सोनखासकर आदी.

नाशिक : प्रतिनिधी

१०० वर्षांना उज्ज्वल इतिहास असणाऱ्या मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने नाशिकच्या केवळ शैक्षणिकच नव्हे, तर सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत अतिशय मोलाचे योगदान दिले आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या व्यवस्थापनातही मविप्रने पुढाकार घेतला असून, सेवाभावी कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या वतीने कुंभमेळा आणि राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित महारक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या अश्विनी सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्र संस्थेच्या सरचिटणीस नीलिमा पवार होत्या. यावेळी व्यासपीठावर नाना महाले, भाऊसाहेब खातळे, अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील, शिक्षणाधिकारी प्रा. रामनाथ चौधरी, प्राचार्य डॉ. महेश मित्रा, प्राचार्य डॉ. जे. डी. सोनखासकर, डॉ. बालाजी आलम्मले, डॉ. प्रीती बजाज आदी उपस्थित होते. स्व. मेजर ध्यानचंद, डॉ. वसंतराव पवार यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. डॉ. मृणाल पाटील यांनी प्रास्ताविक केले. नीलिमा पवार यांनी, मविप्रच्या शतकीय वाटचालीचा आढावा घेतला. मेजर ध्यानचंद यांची वाग्मल्य देशनिष्ठा आणि अभूतपूर्व क्रीडा कौशल्य यांचा आदर्श सर्व क्रीडापटूंनी घेतला पाहिजे. आजच्या शिबिरातून खेळाडूंनी दाखविलेले सामाजिक भान प्रशंसनीय आहे, असेही त्या म्हणाल्या. शिबिराला जिल्हाभरातील २५ हून अधिक महाविद्यालयांच्या राज्य व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत चमकलेल्या पावणेपाचशे क्रीडापटू, युवक-युवतींनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले.

गांवकरी - 12/8/2015

# कुंभमेळ्यातील आपत्ती व्यवस्थापनासाठी डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय सज्ज

। नाशिक ।

सामाजिक व आरोग्य क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असलेल्या डॉ वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाने कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनासाठी केलेली सज्जता उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन अमेरिकेतील इंडसईएम व सिडीसीचे डॉ सागर गळवणकर यांनी व्यक्त केले.

आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात दि. २७ व २८ एप्रिल रोजी घेण्यात आलेल्या सीडीसी आणि इंडसईएम च्या आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या पुढील प्रगतीचा आढावा डॉ. गळवणकर यांनी घेतला , त्यावेळी ते बोलत होते. अधिष्ठाता डॉ मृणाल पाटील यांनी डॉ. गळवणकर यांचे स्वागत केले त्यानंतर डॉ पाटील यांनी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन व महाविद्यालयाची पूर्वतयारी याविषयी माहिती देताना सांगितले की, सिंहस्थ कुंभ मेळ्यासाठी मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात १५० सर्वसामान्य खाटा, २० अतिदक्षता खाटा आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये २४ तास आपत्कालीन सेवा उपलब्ध राहणार आहे. तसेच २५ प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स हे स्वयंसेवी संस्थांच्या रुग्णवाहिका व आरोग्य सेवा केंद्रात पर्यवेक्षणासाठी नियुक्त करण्यात आले आहे. याशिवाय निवासी डॉक्टरांची तपोवन, साधुग्राम, इंदिरा गांधी रुग्णालय, जिल्हा रुग्णालय येथे नियुक्ती करण्यात आली आहे. वैद्यकीय महाविद्यालयाबरोबरच [illegible] महत्व लक्षात घेऊन कुंभमेळ्यादरम्यान विविध संशोधन प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले आहे, जेणेकरून या कुंभमेळ्यातील सर्व अनुभव [illegible] कुंभमेळ्याच्या आपत्ती व आरोग्य व्यवस्थापनासाठी मार्गदर्शक ठरेल असे नियोजन करण्यात आले आहे.

आपत्ती काळात आवश्यक रक्तसाठा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने पहिल्या शाही स्नानाच्या ४ दिवस अगोदर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे , तसेच ब्लड ३५० हा उपक्रम राबविला जात असून यामध्ये ज्याचा वाढदिवस असेल तो विद्यार्थी किंवा व्यक्ती रक्तदान करून उपक्रमात सहभागी होणार असल्याची माहिती डॉ मृणाल पाटील यांनी दिली .

> हरित कुंभमेळा ही संकल्पना राबवत पेठ मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने सामाजिक दायित्व निभावण्यासाठी डॉ.वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या मदतीने गोदावरी स्वच्छता मोहीम यापूर्वी राबविली असून कुंभमेळा काळात वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयाची सुसज्ज आपत्कालीन सेवा तसेच रासेयो व एन सी सी चे स्वयंसेवक गेल्या कुंभमेळ्याप्रमाणे यंदाही उपलब्ध करून दिले जातील .
>
> – श्रीमती निलीमाताई पवार (सरचिटणीस )

लोकमत - 13/5/2015



# 'आरोग्य विद्यापीठ'-'मविप्र'त तू तू मैं मैं

## आपत्कालीन प्रशिक्षण : श्रेयवादावरुन दोन्ही संस्थांमध्ये नाराजी नाट्य

नाशिक : आपत्कालीन प्रशिक्षण देण्यावरून आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि मविप्र संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालयावरून श्रेयवाद सुरू झाला आहे. सदर प्रशिक्षण देण्यासाठी डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाची संपूर्ण यंत्रणा राबत आहे, शिवाय पैसाही खर्च होत असताना विद्यापीठ फुकटचे श्रेय घेत असल्याचे मविप्रचे म्हणणे आहे, तर आमच्यामुळेच मविप्र संस्थेला प्रशिक्षणाची संधी मिळाली असल्याचे आरोग्य विद्यापीठाचे म्हणणे आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी आरोग्य विद्यापीठाने आपत्कालीन प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम आखला असून, त्यासाठी कुंभमेळ्यामध्ये ५८ लाखांची तरतूदही केली आहे. याचा शुभारंभ राज्यपालांच्या हस्ते सिडकोतील क्लस्टर येथे करण्यात आला होता. त्यानंतर विद्यापीठाने मविप्र संस्थेच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय येथे शहरातील पोलीस, होमगार्डस, शासकीय अधिकारी यांच्यासाठी आपत्कालीन प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राबविणे सुरू केले. प्रारंभी या दोन्ही संस्थांनी हातात हात घालून कार्य सुरू केले, परंतु नंतर या दोघांमध्ये श्रेयवाद सुरू झाला.

### विद्यापीठाकडून आव्हान

परदेशातील मान्यवर तज्ज्ञ आमच्यामुळे आल्याचा दावा आरोग्य विद्यापीठाने केला आहे. मविप्र महाविद्यालयाने आता परदेशातील व देशातीलही मान्यवरांना आमंत्रित करून दाखवावे, अशी आव्हान देणारी भूमिका विद्यापीठाने घेतली असल्याचे समजते. दरम्यान, आमच्यात कोणतेही मतभेद नसल्याचा दावाही या दोन्ही संस्थांच्या प्रमुखांनी करीत आम्ही एकमेकांना संलग्न असल्याने आमच्यात सामंजस्य असल्याचेही म्हटले आहे.

प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या साहित्याचा खर्च, तज्ज्ञ मंडळींचे मानधन, त्यांच्या प्रवासाचा आणि राहण्याचा खर्च हा काही वैद्यकीय महाविद्यालयालाच द्यावा लागत आहे. शिवाय त्यासाठी प्रशासकीय कामकाज, प्रॉपर्टी, तसेच मनुष्यबळ हेही वैद्यकीय महाविद्यालयाचे असताना आरोग्य विद्यापीठ मात्र फुकटचे मिरवत असल्याने त्यांना का श्रेय द्यायचे असा मुद्दा पुढे आल्याने आता विद्यापीठालाच बाजूला ठेवण्याचा निर्णय घेण्यात आले असल्याचे समजते. याची सुरुवात म्हणजे मुक्तेश्वर वैद्यकीय महाविद्यालयात सीडीसी अटलांटा, इंडिया-युएस ट्रॉमा इमर्जन्सी कोलाबरेट व नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्कालीन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या पत्रिकेतून कुलगुरू डॉ. अरुण जामकर यांचे नावच कापण्यात आले होते. त्यानंतर मान्यवरांच्या आग्रहानंतर कुलगुरू कार्यक्रमासाठी गेले, मात्र त्यांनीही आता स्वतंत्र आपत्कालीन प्रशिक्षण कार्यक्रम यंत्रणा राबविण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते. (प्रतिनिधी)

'आरोग्य विद्यापीठ'
'मविप्र'त तू तू मैं मैं

नाशिक : आपत्कालीन प्रशिक्षण देण्यावरून आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि मविप्र संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालयावरून श्रेयवाद सुरू झाला आहे.
- [illegible] पान / २